MHLA160003942017

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८७/२०१७</u>**
**<u>शासन वि. तजमील</u>**

**-:: <u>नि.क्र.१ लगत आदेश</u> ::-**

मा. उच्च न्यायालय यांनी दि.०९/०३/२०२६ ते १३/०३/२०२६ पर्यंत फौजदारी प्रकरणाबाबत विशेष मोहीम (Special Drive) आयोजित केलेली आहे. त्याबाबत मा. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूर यांनी पत्र जा.क्र./जि.वी.से.प्रा./३४३/२०२६ तारीख ०७/०३/२०२६ प्रमाणे कळविलेले आहे.

०२. सदर प्रकरण हे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १२-अ च्या गुन्ह्याकरिता दि.२६/०७/२०१७ रोजी दाखल झाले. तेव्हापासून सदर प्रकरणामध्ये कोणतीही प्रगती नाही. आरोपीला वॉरंटची बजावणी झालेली नाही. पोलिसांनी आरोपी मिळून न आल्याने वॉरंट विनातामील परत केलेले आहेत. प्रकरण फार जुने आहे. भविष्यामध्ये सुध्दा सदर वॉरंटची बजावणी होऊन आरोपी हजर होण्याची शक्यता दिसून येत नाही. पोलिसांनी व अभियोग पक्षाने आरोपीचे वॉरंट बजावण्यास कसूर केला. त्यामुळे सदर प्रकरण गुणवत्तेवर सुध्दा अभियोग पक्षाच्या बाजुने निकाली काढता येणार नाही. सदर प्रकरण विनाकारण व विना प्रगती प्रलंबित ठेवणे अनुचित ठरेल. सबब सदर प्रकरण हे विशेष मोहीमेअंतर्गत भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे बंद करण्यास योग्य आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण बंद करण्यात येते व आरोपीला दोषमुक्त करण्यात येते.

०३. अपील कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मुद्देमाल म्हणजे जुगाराचे साहित्य नष्ट करावेत व जप्त रक्कम ही शासन जमा करावी.

०४. अपील कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास जप्त मोबाईल सार्वजनिक लिलावामध्ये विकून त्याची रक्कम शासन जमा करावी.

०५. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:35:45 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**
**दिनांक – १३-०३-२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**